मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुण्याचे पालकमंत्रीपद अजितदादांकडे!

## जिल्ह्यातील राजकीय गणित बदलणार; कार्यकर्त्यांचा जल्लोष

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती होताच अजित पवार यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील अजित पवार समर्थक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. ठिकठिकाणी पेढे वाटण्यात आले तसेच फटाके फोडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. पुणे शहरात शहराध्यक्ष माजी उपमहापौर दीपक मानकर, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख यांच्या नेतृत्वात जल्लोष साजरा करण्यात आला. तर पिंपरी चिंचवड मध्ये माजी विरोधी विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील,



कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, फजल शेख, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, विशाल काळभोर, प्रदेश ओबीसी सेलचे उपाध्यक्ष सचिन औटे, माजी नगरसेवक ॲड. गोरक्ष लोखंडे, सतीश दरेकर, प्रभाकर वाघेरे, युवक कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, महिला कार्याध्यक्ष कविता खराडे, यांच्यासह पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड शहर हे देशातील सर्वांत वेगाने विकसीत होणारे शहर म्हणून नावारुपाला आले . अजित पवार उपमुख्यमंत्री होताच त्यांनी शहरात लक्ष घालण्यास सुरूवात केली असून गेल्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले आहेत.तसेच आता पालकमंत्रीपदही त्यांच्याकडे आल्याने रखडलेल्या कामांना गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्याचा बारीक अभ्यास असल्याने तसेच पुढील ५० वर्षांच्या विकासाच्या नियोजनाची दृष्टी दादांकडे असल्यामुळे शहर व जिल्ह्याच्या विकासात भर पडेल असा विश्वासही अजित गव्हाणे यांनी केला आहे.

> “अजित पवार उपमुख्यमंत्री होताच त्यांनी पिंपरी चिंचवड शहरात लक्ष घालण्यास सुरवात केली असून, गेल्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले आहेत. त्यांच्याकडे पुन्हा एकदा पालकमंत्रीपद आल्यामुळे पिंपरी चिंचवडसह पुणे शहर आणि पुणे जिल्ह्याचा विकास वेगाने होण्यास मदत होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळेल.
> - **अजित गव्हाणे**, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट).

# मासिकपाळीत धोक्याकडे दुर्लक्ष नकोच!

## मासिक पाळीत ३० ते ४५ एमएल रक्तस्त्राव आवश्यक

**मनीषा थोरात पिसाळ**

**। मोशी न्यूज एक्सप्रेस।**

आपले शरीर कोणत्याही समस्येबद्दल काही चिन्हे आणि लक्षणांच्या रूपात माहिती देण्यास सुरुवात करते. जगभरात अब्जावधी स्त्रिया मासिक पाळीतून जातात. काहींसाठी, हा काळ खूप वेदनादायक असतो. परंतु मासिक पाळीच्या वेळी दिसणाऱ्या धोक्याची सूचना महिलांना नसते किंवा त्या त्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळेच महिलांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. मासिक पाळीमध्ये किती रक्तस्राव झाला पाहिजे, त्याचे प्रमाण आहे. ३० ते ४५ एमएल रक्तस्राव नॉर्मल आहे. मात्र अनेक महिलांना जास्त प्रमाणात रक्तस्राव होतो. तर काहींना रक्तांच्या गुठळ्या जातात.



परिणामी महिलांमध्ये अनिमियाचे प्रमाण वाढले जाते. भारतातील ७० ते ७५ टक्के महिलांचे हिमोग्लोबिन १० पेक्षा कमी आढळते असे डॉ.भाग्यश्री लहाने यांनी सांगितले. आजकालच्या महिलांना गर्भपात नॉर्मल गोष्ट वाटते. मात्र याच परिमाण स्त्रींयाच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होतो आहे. मासिक पाळी, गर्भपात या गोष्टींमुळे महिला शारिरकदृष्ट्या दुर्बल होते. मासिक पाळी दरम्यान काही प्रमाणात क्रॅम्पिंग होणे पूर्णपणे सामान्य आहे. पण जर ह्यांचा अतिरेक झाला आणि त्यामुळे तुमच्या सामान्य दिनचर्ये वरही परिणाम होऊ लागला तर ही धोक्याची घंटा आहे. पेनकिलर घेतल्यानंतरही वेदना असह्य राहिल्यास, तुम्हाला एडेनोमायोसिस, फायब्रॉइड्स किंवा एंडोमेट्रिओसिसचा धोका असू शकतो. जर ते असह्य झाले तर शक्य तितक्या लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

### मासिक पाळीत अचानक बदल

» जर तुम्हाला मासिक पाळीत अचानक बदल जाणवत असेल, जसे की रक्तस्त्राव सामान्यपेक्षा खूपच हलका किंवा जास्त असेल तर ते शरीरात काहीतरी चुकीचे असल्याचे सूचक आहे. तरुण स्त्रियांमध्ये अनियमित रक्तस्त्राव गंभीर नसला तरी चाळीशीपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये हे अधिक गंभीर लक्षण असू शकते. चाळीस वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा पॉलीप्स, एंडोमेट्रियल कर्करोग किंवा पूर्व-कॅन्सर लक्षणे, हायपरप्लासिया नावाच्या स्थितीत लक्षणे असू शकतात. प्राथमिक अवस्थेत आढळल्यास त्यांच्यावर योग्य उपचार करता येतात, असे डॉ.भाग्यश्री लहाने-मुंढे यांनी सांगितले.

# महापालिका अतिरिक्त आयुक्तांची फेरनियुक्ती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे-पाटील यांची प्रतिनियुक्तीने फेरनियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची दोन वर्षांसाठी नियुक्ती असणार आहे. याबाबतचे आदेश शासनाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी-छापवले यांनी काढले. महापालिकेत उपायुक्त असलेल्या स्मिता झगडे यांची १३ सप्टेंबर २०२२ रोजी राज्य शासनाने अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली. त्यानंतर राज्य शासनाने २२ सप्टेंबर २०२२ रोजी झगडे यांची नियुक्ती रद्द करुन प्रदिप जांभळे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली. पण, झगडे यांनी जांभळे यांच्या नियुक्तीला महाराष्ट्र प्रशासकीय लवाद (मॅट) आव्हान दिले होते. त्यावर जांभळे यांची अतिरिक्त आयुक्तपदावरील नियुक्ती २२ सप्टेंबर २०२३ पर्यंतच राहील. त्यादिवसापासून जांभळे यांची दोन वर्षांची नियुक्ती संपुष्टात येईल. जांभळे यांची पुन्हा पात्रता तपासण्याबाबत निर्देश दिले होते. मॅटच्या आदेशानुसार प्रतिनियुक्तीच्या पदाकरिता पात्रता पुनःश्च तपासण्यात आली. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने जांभळे यांची महापालिका अतिरिक्त आयुक्त पदावरील प्रतिनियुक्ती पुढील दोन वर्षांसाठी कायम ठेवण्यात आली आहे.

# महाराष्ट्र महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी पिंपरी चिंचवडच्या खुशी!

## मुल्ला हिची निवड झाल्याबद्दल महापालिकेच्या वतीने सन्मान

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** काळेवाडी येथील खुशी मुल्ला या महिला खेळाडूची १९ वर्षांखालील महाराष्ट्र महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असल्याने औद्योगिक तसेच क्रीडानगरी असलेल्या पिंपरी चिंचवड शहरासाठी ही अतिशय अभिमानास्पद बाब असून त्यामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले. तसेच खुशी मुल्ला या क्रिकेटच्या इतिहासात दैदिप्यमान अशी कामगिरी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. खुशी मुल्ला या महिला क्रिकेट खेळाडूची महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली. या निमित्ताने खुशी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भेट दिली. त्यादरम्यान त्यांचा अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सत्काराच्या वेळी क्रिडा अधिकारी अनिता केदारी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक शादाब शेख तसेच खुशी मुल्ला यांचे वडील नवीलाल मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते संजय गायके आदी उपस्थित होते. खुशी मुल्ला यांनी थेरगाव येथील व्हेरॉक वेंगसरकर अकादमी येथे १० वर्षांपुर्वी प्रवेश घेऊन क्रिकेट खेळण्यास सुरूवात केली. त्यांनी १६ वर्षाखालील, १९ वर्षाखालील, २३ वर्षाखालील गटात महाराष्ट्र



क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व केले, त्यांना भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शनही लाभले आहे. वेंगसरकर अकादमीचे क्रिकेट प्रशिक्षक शादाब शेख यांनी बोलताना महानगरपालिकेने क्रिकेट खेळासाठी प्रशस्त मैदान तसेच सरावादरम्यान पावसाने व्यत्यय येऊ नये यासाठी बंदिस्त इनडोअर हॉल उपलब्ध करून दिल्यामुळे सराव करण्यास सुलभता निर्माण झाली. त्यामुळेच खुशी मुल्ला ही उदयोन्मुख खेळाडू तयार झाली असून अनेक खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत, असे सांगून भविष्यात खुशी मुल्ला या भविष्यात क्रिकेटमध्ये फक्त शहराचेच नव्हे तर देशाचेही नाव उंचावणारी कामगिरी करतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कर्णधार खुशी मुल्ला म्हणाल्या, लहाणपणापासूनच मला क्रिकेटची आवड होती. मोठा भाऊ देखील राष्ट्रीय पातळीवर क्रिकेट खेळायचा त्यामुळे साहजिक क्रिकेटविषयी आवड व प्रेम निर्माण झाले. माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी थेरगाव येथे व्हेरॉक वेंगसरकर अकादमीची स्थापना केली तसेच त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शनही केले. अकादमीमध्ये भव्य क्रिकेट मैदान आहे तसेच शादाब शेख यांच्यासह इतर मार्गदर्शकांनी माझ्याकडून उत्तम सराव करून घेतल्याने माझा आत्मविश्वास वाढला आणि माझी कर्णधारपदी निवड झाली, या गोष्टीचा मला अतिशय आनंद होत असून पिंपरी चिंचवड शहरातून माझी निवड झाल्याने शहराच्या नावलौकिकात भर पाडण्यात मी निश्चितच जास्तीत जास्त प्रयत्न करेन, असा विश्वासही खुशी मुल्ला यांनी व्यक्त केला. खुशीला लहाणपणापासूनच क्रिकेटची आवड होती. मोठा भाऊ अमन मुल्ला याने क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. त्याच्यापासूनच खुशीने प्रेरणा घेतली तसेच दिलीप वेंगसरकर यांनी वैयक्तिक लक्ष देऊन वेळोवेळी खुशीला मार्गदर्शनही केले. त्यामुळेच ती गौरवास्पद कामगिरी करू शकली, असे खुशीचे वडील नवीलाल मुल्ला यांनी सांगितले.

# बालहक्क संरक्षण सदस्यांकडून वायसीएम रुग्णालयाची पाहणी!

## नवजात बालकांचे मृत्यू याची गंभीर दखल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यात सरकारी हॉस्पिटलमध्ये होत असलेले मृत्यू व त्यातही नवजात बालकांचे मृत्यू याची गंभीर दखल महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगातर्फे घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य बालहक्क आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे यांनी बुधवारी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयास अचानक



भेट देऊन तेथील बालरोग विभागाची पाहणी केली व तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. बालरोग विभागातील व्हेंटिलेटर, ऑक्सिजन यंत्रणा, विविध वैद्यकीय उपकरणे, गंभीर बालकांसाठी असलेली व्यवस्था, अतिदक्षता विभाग, औषधे, लसीचा पुरवठा याचा पुरंदरे यांनी आढावा घेतला. बालरोग विभागात दाखल असलेले एकूण बालरुग्ण, गंभीर, अतिगंभीर बालरुग्ण याबाबत पुरंदरे यांनी माहिती घेतली. यावेळी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. दीपाली अंबिके (धउचक) उपस्थित होत्या. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील परिस्थिती समाधानकारक आहे, तसेच पुरेसा अनुभवी कर्मचारी वर्ग, नर्सेस, डॉक्टर्स उपलब्ध आहेत. दाखल होणारी बालरुग्ण संख्या पाहता अजून एका वॉर्डची आवश्यकता आहे, असे पुरंदरे यावेळी म्हणाले.

# लाच प्रकरणी कार्यकारी अभियंत्यावर गुन्हा दाखल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ग्राहकाच्या घरी सोलर सिस्टिम बसवल्याबाबत तपासणी अहवाल देण्यासाठी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याने सोलर सिस्टिमच्या ठेकेदाराकडे दहा हजारांची लाच मागितली. याची पडताळणी करत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) याप्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. राजेंद्रकुमार साळुंखे असे गुन्हा दाखल झालेल्या कार्यकारी अभियंत्याचे नाव आहे. याप्रकरणी ३८ वर्षीय व्यक्तीने एसीबी कडे तक्रार केली आहे. तक्रारदार हे सोलर सिस्टिमचे ठेकेदार आहेत. सोलर सिस्टिम बसविण्याबाबत ग्राहक व एमएसईडीएल (महावितरण) यांच्यामध्ये ते लायझनिंगचे काम करतात. तक्रारदार यांनी एका ग्राहकाच्या घरी सोलर सिस्टीम इन्स्टॉलेशनचे काम केले होते. (उहळपलहुरव) त्या कामाची एनओसी / तपासणी अहवाल मिळण्यासाठी त्यांनी महावितरण कार्यालयात ऑनलाईन अर्ज केला होता. त्याचा पाठपुरावा तक्रारदार स्वत: करीत होते.

# फिरत्या हौदांकडे पुणेकरांची पाठ!

## फिरत्या हौदाची सुविधा देण्याचा घाट महापालिकेने घातल्याचे स्पष्ट

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** फिरत्या हौदांमध्ये गणेश मूर्ती विसर्जन होत नसतानाही फिरत्या हौदाची सुविधा देण्याचा घाट महापालिकेने घातल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षी फिरत्या हौदांमध्ये १३ टक्के गणेश मूर्तींचे विसर्जन झाले होते. यंदा त्याहीपेक्षा कमी केवळ १०.५ टक्के मूर्तींचे विसर्जन झाले. त्यामुळे १५० फिरत्या हौदांसाठी महापालिकेने केलेला दीड कोटी रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे गणेशमूर्ती विसर्जनासाठी गेली दोन वर्षे एकाच जागी उभ्या असणाऱ्या फिरत्या हौदांची सुविधा यंदा उपलब्ध न करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी जाहीर केला होता. मात्र अचानक १५० फिरत्या हौदांची सुविधा देण्याचे निश्चित करून त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. फिरत्या हौदांमध्ये मूर्ती विसर्जन होत नसल्याचे गेल्या तीन वर्षांमध्ये दिसून आल्यानंतरही हा घाट घालण्यात आला होता. यंदाही फिरत्या हौदात अपेक्षित मूर्ती विसर्जन न झाल्याने या सुविधेवरील प्रश्नचिन्ह कायम राहिले असून, हा खर्च नेमका कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित होण्यास सुरुवात झाली असून, सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी आकडेवारीसह ही बाब आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. सन २०१९ पर्यंत अनेक वर्षे महापालिकेने गणेश विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी, तसेच घाटांवर ४६ बांधलेले हौद, ३५९ लोखंडी टाक्या, १९१ मूर्ती संकलन- दान केंद्रे अशी व्यवस्था केली होती. ही यंत्रणा पुरेशी ठरत होती. यंदा करोना निर्बंध नसल्याने २०१९ प्रमाणे गणेश विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी तसेच घाटांवर ४६ बांधलेले हौद, ३५९ लोखंडी टाक्या, १९१ मूर्ती संकलन- दान केंद्रे अशी व्यवस्था उपलब्ध होती. मात्र पाचव्या, सहाव्या, सातव्या आणि अकराव्या दिवशी फिरत्या हौदांची सुविधा असेल, असे महापालिकेने जाहीर केले होते.



विसर्जनाच्या सहाव्या दिवशी १६७ मूर्तींचे फिरत्या हौदांत विसर्जन झाले. आठव्या दिवशी शून्य, नवव्या दिवशी ८६०, तर अकराव्या दिवशी एकाही गणपतीचे विसर्जन या हौदांत झाले नाही. यंदा पाचवा दिवस व गौरी-गणपती विसर्जन एकाच दिवशी आल्याने त्या दिवशी तरी जास्त गणपतींचे विसर्जन फिरत्या हौदांत होईल अशी अपेक्षा होती. मात्र त्या दिवशी विसर्जन झालेल्या ९५ हजार ४१ गणपतींपैकी फक्त चार हजार २८७ म्हणजेच साडेचार टक्के गणपतींचे विसर्जन फिरत्या हौदांत झाले. गेल्या वर्षी गौरी विसर्जन सहाव्या दिवशी होते, तेव्हा पाचव्या व सहाव्या दिवशी मिळून आठ हजार ३६३ गणपतींचे विसर्जन फिरत्या हौदात झाले होते.

फिरत्या विसर्जन हौदात गेल्या वर्षी १३ टक्के गणपतींचे विसर्जन झाले तर यंदा साडेदहा टक्केच गणपतींचे विसर्जन झाले. यावरून ९० टक्के भाविकांना या फिरत्या विसर्जन हौदांची गरजच भासली नाही. तरीही आयुक्तांच्या अट्टाहासापायी जनतेच्या दीड कोटी रुपयांचे फिरत्या विसर्जन हौदात विसर्जन झाले. त्यामुळे ठेकेदाराला केवळ सातव्या आणि दहाव्या दिवसाची रक्कम द्यावी आणि पुढील वर्षापासून हा वायफळ खर्च बंद करावा, असे वेलणकर यांनी सांगितले.


### महापालिकेने केले होते जाहीर!

» सन २०१९ पर्यंत अनेक वर्षे महापालिकेने गणेश विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी, तसेच घाटांवर ४६ बांधलेले हौद, ३५९ लोखंडी टाक्या, १९१ मूर्ती संकलन–दान केंद्रे अशी व्यवस्था केली होती. ही यंत्रणा पुरेशी ठरत होती. यंदा करोना निर्बंध नसल्याने २०१९ प्रमाणे गणेश विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी तसेच घाटांवर ४६ बांधलेले हौद, ३५९ लोखंडी टाक्या, १९१ मूर्ती संकलन–दान केंद्रे अशी व्यवस्था उपलब्ध होती. मात्र पाचव्या, सहाव्या, सातव्या आणि अकराव्या दिवशी फिरत्या हौदांची सुविधा असेल, असे महापालिकेने जाहीर केले होते.

# महापालिकेकडून शहरातील रस्त्यांचे पुन्हा सर्वेक्षण!

## रस्त्यांची एकूण लांबीची निश्चित माहिती संकलित करण्यासाठी पालिकेचा निर्णय

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील रस्त्यांची सद्य:स्थिती, रस्त्यांची एकूण लांबीची निश्चित माहिती संकलित करण्यासाठी महापालिकेकडून शहरातील रस्त्यांचे पुन्हा सर्वेक्षण केले जाणार आहे. सहा वर्षांनंतर असे सर्वेक्षण करण्यात येणार असून, सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांचे तांत्रिक विश्लेषण करून रस्तेदुरुस्ती आणि देखभालीचा प्राधान्यक्रम ठरविण्यात येणार आहे. त्यासाठी साडेचार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, पुढील दीड ते दोन वर्षांत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. शहरात एक हजार ४०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे जाळे आहे. यामध्ये सिमेंट, डांबरी रस्त्यांचा समावेश आहे. महापालिका हद्दीत ३४ गावांचा समावेश झाल्याने या गावातील २०० ते ३०० किलोमीटर लांबीचे रस्ते महापालिका हद्दीत आले आहेत. त्यामुळे शहराच्या हद्दीत किती किलोमीटर अंतराचे रस्ते आहेत, याची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी रस्त्यांचे फेरसर्वेक्षण करण्यात येणार आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहन संख्येचा विचार करता प्रत्येक वर्षी रस्ता रुंदीकरण आणि नवीन रस्ते



झाले, याची माहिती सर्वे क्षणात निश्चित होणार आहे. गुगल स्ट्रीटच्या धर्तीवर अत्याधुनिक कॅमेरे असलेले वाहन त्यासाठी वापरण्यात येणार आहे. लेझर सेन्सरच्या माध्यमातून रस्त्यावरील खड्डे तसेच रस्त्याचा उतार आणि गुणवत्तेची तपासणी होणार आहे. प्रत्येक पाच किलोमीटर अंतराचे छायाचित्र घेतले जाणार असून, अक्षांश आणि रेखांश निश्चित केला जाणार आहे. चित्रीकरणामुळे रस्त्यावरील चेंबर, पावसाळी वाहिन्या, खड्डे यांची माहितीही मिळणार असून त्यानुसार रस्ते दुरुस्तीचा प्राधान्यक्रमही महापालिकेला निश्चित करता येणार आहे. रस्त्यालगतच्या पदपथांचे मोजमापही कळणार आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून संकलित माहितीनुसार रस्त्यांची श्रेणी निश्चित केली जाणार आहे. त्यानुसार एक ते पाच अशा श्रेणीमध्ये रस्त्यांची विभागणी होणार असून, त्या श्रेणीतील रस्त्यासाठी निधीचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच पाणीपुरवठा, मल:निस्सारण, विद्युत विभागाच्या कामांमुळे रस्त्याची वारंवार होणारी खोदाई टाळता येणार असून, रस्ते खड्डेविरहित ठेवण्यास मदत होईल, असा दावा महापालिकेच्या पथ विभागाकडून करण्यात आला आहे. महापालिकेच्या जीआयएस प्रणालीमध्ये ही सर्व माहिती समाविष्ट करण्यात येणार आहे.

> “ रस्त्याची लांबी, रुंदी, प्रकार, पदपथ, सायकल मार्ग आदीची माहिती या माध्यमातून अद्ययावत होणार आहे. रस्त्यांवर विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या जाणार आहेत. त्यातून रस्त्याची गुणवत्ता आणि वाहकक्षमताही तपासली जाईल. रस्त्यांच्या दुरुस्तीच्या थरांची जाडी निश्चित करता येणार आहे.
>
> – व्ही. जी. कुलकर्णी,
> मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका

# पुणेरी मेट्रोला महामेट्रोशी जोडणार!

## दीडशे मीटरचा पादचारी पूल उभारणार

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। पुणेरी मेट्रो आणि शिवाजीनगर मेट्रो यांची स्थानके जिल्हा न्यायालय परिसरात आहेत. या दोन्ही स्थानकांना पादचारी पुलाने जोडण्यात येणार आहे. हा पादचारी पूल १५० मीटरचा असणार आहे. या पुलामुळे दोन्ही मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एका स्थानकातून दुसऱ्या स्थानकात जाणे सोपे होणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) पुणेरी मेट्रो म्हणजे हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गाचे काम सुरू आहे. याचवेळी महामेट्रोचा पिंपरी-चिंचवड ते जिल्हा न्यायालय हा मार्ग सध्या सुरू आहे. या मार्गावर शिवाजीनगर येथे इंटरसेक्शन स्थानक आहे. या स्थानकात दोन्ही मेट्रोंना आतमध्ये प्रवेश करता येणार आहे अथवा बाहेर पडता येणार आहे. सध्या महामेट्रोचे स्थानक जिल्हा न्यायालय परिसरात आहे. याचवेळी पीएमआरडीएकडून जिल्हा न्यायालय परिसरातच स्थानकाची उभारणी केली जात आहे. पुणेरी मेट्रो आणि महामेट्रोच्या प्रवाशांना या दोन्ही स्थानकांमध्ये ये जा करणे सोपे व्हावे, यासाठी पादचारी पुलाने ही स्थानके जोडण्यात येणार आहेत. हा पादचारी पूल उभारण्यात येणार आहे. या पादचारी पुलाचा आराखडा तयार आहे. पुणेरी मेट्रोच्या जिल्हा न्यायालय परिसरातील स्थानकाचे काम पूर्ण होत आले की या पादचारी पुलाचे काम सुरू होईल, अशी माहिती महामेट्रोचे संचालक (कार्य) अतुल गाडगीळ यांनी दिली. महामेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशाने परतीचे तिकीट काढले असेल तर त्याची वैधता पूर्ण दिवसभर आहे. मेट्रो सेवा सुरू झाल्यापासून हा नियम आहे. सेवा सुरू असलेल्या कालावधीत दिवसभरात प्रवाशांना परतीच्या तिकिटाने प्रवास करता येतो, अशी माहिती महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी दिली.



> “पुणेरी मेट्रो आणि महामेट्रो यांच्या जिल्हा न्यायालय परिसरातील दोन स्थानकांमध्ये १५० मीटरचे अंतर आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी ही स्थानके पादचारी पुलाने जोडली जाणार आहेत. हे काम पीएमआरडीएकडून केले जाईल.
>
> – रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता, पीएमआरडीए

# सायबर गुन्हेगारांपासून सावध राहण्यासाठी मार्गदर्शन

## कर्वे समाजकार्य महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिक दिनाचे आयोजन

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। ज्येष्ठ नागरिकांनी सायबर गुन्हेगारांद्वारे होणाऱ्या आर्थिक फसवणुकीपासून वाचण्यासाठी सतर्क रहावे. फसव्या मोबाईल कॉल, लिंकला प्रतिसाद देणे टाळावे, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक दिनाच्या अनुषंगाने समाज कल्याण विभाग तसेच कर्वे समाजकार्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आर्थिक सायबर गुन्हे मार्गदर्शन व परिसंवाद' कार्यक्रमात करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त कर्वे समाजकार्य महाविद्यालय येथे आयोजित कार्यक्रमास कार्यक्रमास सहायक आयुक्त, समाज कल्याण विशाल लोंढे, कर्वे समाज सेवा संस्थेचे विश्वस्त मधूकर पाठक, समाज कल्याण विभागाचे विशेष अधिकारी मल्लीनाथ हरसुरे, कर्वे समाज सेवा संस्थेचे विश्वस्त संदिप खर्डेकर, चेअरमन विनायक कराळे, ग्लोबन्ट प्रा. लि.चे एशिया हेड शिवराज साबळे, डिजिटल टास्क फोर्सचे रोहन न्यायाधिश, सीएसआर सेंटर फॉर मेंटल हेल्थचे मानद संचालक डॉ. महेश ठाकूर, ऑस्कॉप संस्थेचे उपाध्यक्ष श्रीराम बेडकिहाळ, नीलकंठ बजाज, ज्येष्ठ नागरिक आदींची उपस्थिती होती. डॉ. महेश ठाकूर यांनी ज्येष्ठ नागरिकांची सायबर गुन्हेगारीद्वारे आर्थिक फसवणुक होण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने तसेच ज्येष्ठ नागरिकांना याबाबत नवीन माहिती व याबाबतचे ज्ञान मिळण्यासाठी सायबर गुन्हेगारीबाबत मार्गदर्शन व परिसंवाद या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. या प्रसंगी साबळे यांनी सायबर गुन्हेगारीद्वारे ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणुक कशा पध्दतीने होते व ती आपल्या सतर्कतेने कशी रोखता येते याबाबत मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या मोबाईलवर संशयास्पद येणाऱ्या विविध संकेतस्थळांच्या लिंक ओपन करु नये. तसेच वन टाईम पासवर्ड (ओटीपी) कोणालाही उघड करु नये, आदी मार्गदर्शन त्यांनी केले. लोंढे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या वेळेचा सदुपयोगासाठी विविध विषयांच्या अद्ययावत असणाऱ्या माहितीचे वाचन करून आपल्या व पुढील पिढीसाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावावी. ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या कायद्यांबाबत माहिती घेऊन अडचणी सोडविण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा. समाज कल्याण कार्यालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष लवकरच स्थापन करण्यात येईल. तसेच प्रत्येक कार्यक्षेत्रामध्ये विरंगुळा केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्यासह त्यांना विविध सोयी-सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही ते म्हणाले. न्यायाधीश यांनी कोणताही अॅप डाऊनलोड करताना सहजपणे आपण परवानगी देत असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची फसवणुक कशा पद्धतीने केली जाते. बनावट व्हिडिओज कसे पाठविले जातात आणि त्या माध्यमातून कशा पद्धतीने आर्थिक फसवणूक केली जाते याबाबत माहिती देवून सायबर गुन्हेगारी कशा प्रकारे रोखता येईल याबाबत मार्गदर्शन केले.



### ज्येष्ठ नागरिकांची फसवणुक?

» ज्येष्ठ नागरिक कक्ष लवकरच स्थापन करण्यात येईल. तसेच प्रत्येक कार्यक्षेत्रामध्ये विरंगुळा केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्यासह त्यांना विविध सोयी-सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही ते म्हणाले. न्यायाधीश यांनी कोणताही अॅप डाऊनलोड करताना सहजपणे आपण परवानगी देत असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची फसवणुक कशा पद्धतीने केली जाते.